प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक

RESERVE BANK OF INDIA

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi

Website : www.rbi.org.in

ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, शहीद भगत सिंह मार्ग, फोर्ट, मुंबई-400001

**Department of Communication**, Central Office, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai-400001 फोन/Phone: 022- 22660502

**12 फेब्रुवारी 2024**

# भारतीय रिझर्व बँकेने द अंजनगाव सुर्जी नागरी सहकारी बँक लिमिटेड, अंजनगाव सुर्जी, महाराष्ट्र वर आर्थिक दंड ठोठावला.

भारतीय रिझर्व बँकेने दिनांक 8 फेब्रुवारी 2024, रोजीच्या आदेशाद्वारे द अंजनगाव सुर्जी नागरी सहकारी बँक लिमिटेड, अंजनगाव सुर्जी, महाराष्ट्र (बँक) वर, बँकिंग नियमन कायदा 1949 (BR कायदा) च्या कलम 56 सह लागू असलेल्या कलम 35(A)(1) आणि 36(1) अंतर्गत जारी केलेले निर्देश व विशिष्ट निर्देशांचे पालन न केल्याबद्दल ₹0.50 लाख (केवळ पन्नास हजार रुपये) चा आर्थिक दंड ठोठावला आहे. बँकिंग नियमन कायदा, 1949 च्या कलम 46(4)(i) आणि कलम 56 सह लागू असलेल्या कलम 47A(1)(C) अन्वये भारतीय रिझर्व बँकेला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून हा दंड ठोठावण्यात आला आहे.

हि कृती नियामक अनुपालनातील कमतरतांवर आधारित आहे आणि यात बँकेने तिच्या ग्राहकांशी केलेल्या कोणत्याही व्यवहारांच्या किवा करारांच्या वैधतेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करण्याचा हेतू नाही.

## पार्श्वभूमी

31 मार्च 2022 रोजीच्या आर्थिक स्तिथीवर आधारित बँकेच्या वैधानिक तपासणी आणि जोखीम मुल्यांकन अहवालाचे परीक्षण आणि या संबंधित सर्व पत्रव्यवहारावरून असे निदर्शनास आले कि बँकेने, i) भारतीय रिझर्व बँकेने, बँकिंग नियमन कायदा, 1949 च्या कलम 56 सह लागू असलेल्या कलम 35A(1) अन्वये जारी केलेल्या निर्देशानुसार, आपल्या खातेदारांना विहित मर्यादेपेक्षा जास्त पैसे काढण्याची परवानगी दिली आणि ii) सुपरवायझरी एक्शन फ्रेमवर्क अंतर्गत विशेष निर्देश जारी केल्यानंतरही त्याचे उल्लंघन करीत नवीन कर्ज मंजूर केले. परिणामी, बँकेला कारण दाखवा नोटीस बजावण्यात आली होती, ज्यात म्हटल्याप्रमाणे , वरील निर्देशांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्याबद्दल बँकेला दंड का आकारला जाऊ नये याची कारणे दाखवा अशी विचारणा करण्यात आली होती.

नोटीसला बँकेने दिलेले उत्तर व वैयक्तिक सुनावणीच्या वेळी बँकेने सादर केलेले तोंडी निवेदन व त्यानंतर केलेले अतिरिक्त निवेदन विचारात घेता भारतीय रिझर्व बँक या निष्कर्षावर पोहोचली कि भारतीय रिझर्व बँकेच्या निर्देशांचे पालन न केल्याचे सिद्ध होते आणि आर्थिक दंड लावला जाणे आवश्यक आहे.

**(योगेश दयाल)**

**प्रेस प्रकाशनी : 2023-2024/1867** **मुख्य महा प्रबंधक**